**नवी मुंबई महानगरपालिका**

**महापालिका विशेष सर्वसाधारण सभा**

महानगरपालिकेच्या शुक्रवार, दिनांक 13 डिसेंबर 2019 रोजी भरलेल्या विशेष सर्वसाधारण सभेत मंजूर/नामंजूर इ. ठरावाची माहिती संक्षिप्त आणि मसुदा स्वरूपात खालीलप्रमाणे आहे.:-

| | |
|---|---|
| **विषय क्र. 01**<br>**दिनांक 13 डिसेंबर 2019** | महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, 1966 चे कलम-26 अन्वये नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्राची प्रारुप विकास योजना प्रसिध्द करणे व कलम 28(2) नुसार नियोजन समिती गठीत करणेच्या आयुक्तांचे दिनांक 11/02/2019 चे पत्र क्र. नमुंमपा/नरवि/ससंनर/452/2019 रोजीचे पत्र." |
| **ठराव क्र. 1516.**<br>**दिनांक 13 डिसेंबर 2019** | 1) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, 1966 च्या कलम 26 (1) नुसार प्रारुप विकास योजना सुधारणांसह प्रसिद्ध करण्यास, सदर अधिनियमाचे कलम 148 अे अन्वये मुदतवाढीस,<br>2) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, 1966 च्या कलम 26 (1) अन्वये प्रारुप विकास योजना प्रसिद्ध झाल्यानंतर प्राप्त होणा-या सुचना / हरकतदारांना सुनावणी देण्यासाठी अधिनियमाचे कलम 28 (2) अन्वये गठीत होणा-या नियोजन समितीवर महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या खालील तीन (03) सदस्यांची, सदस्य म्हणून नेमणूक करण्यास,<br><br>i) श्री. रविंद्र उद्धव इथापे<br>ii) डॉ. जयाजी के. नाथ<br>iii) श्रीम. मनिषा शशिकांत भोईर<br><br>3) उपरोक्त ठरावाच्या अनुषंगाने आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी प्रस्तावित केलेल्या प्रस्तावात महानगरपालिका सर्वसाधारण सभेने केलेल्या सुधारणांसह पुढील प्रशासनीक कार्यवाही करण्यास, प्रस्तावात नमुद करण्यात आलेल्या बाबींसह सुचविल्याप्रमाणे मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय** | **मंजूर** |

**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
**महापालिका सचिव**
**नवी मुंबई महानगरपालिका**